# जाहीर नोटीस

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या
( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खलीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे पिंपळे सौदागर** येथील **स.नं. १६१/१२ पै. सि.स.नं. १३३७** मधील **श्रीम. निर्मला संजय काटे व इतर तर्फे कु.मु.धा. व स्वत: साठी श्री.पंकज संजय काटे** यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील ४५.० मी. रस्ता व बांधकाम अयोग्य क्षेत्र ४००.०० चौ.मी जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

पुर्व - सि.स.नं. १३३७ पैकी ची मिळकत.
पश्चिम - सि.स.नं. १३३७ पैकी ची मिळकत.
उत्तर - सि.स.नं. १३३७ पैकी ची मिळकत.
दक्षिण - सि.स.नं. १३३७ पैकी ची मिळकत.

परिशिष्ट २)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे पिंपळे सौदागर** येथील **स.नं १६१/६ पैकी, सि.स.नं. १३३६ पैकी** मधील **विलास गेणु भिसे, व ईतर ,तसेच धोंडाबाई शंकर भिसे व ईतर** यांचे **तर्फे मे.जी.के. डेव्हलपर्स तर्फे श्री. हरी निश्चलदास जेसवानी व ईतर (POAH) व श्री. गुरूबक्ष विशनदास पहलानी यांच्या** मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील ४५ मी. रस्ता व ३० मी. HCMTR बाधित क्षेत्र ११४७.४९ चौ.मी जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

पुर्व - सि.स.नं. १३०७ ची मिळकत.

पश्चिम - सि.स.नं. १३३८ ची मिळकत.

उत्तर - स.नं १६१ पैकी, सि.स.नं. १३३६ पैकी ची मिळकत.

दक्षिण - स.नं १६१ पैकी, सि.स.नं. १३३६ पैकी ची उर्वरीत मिळकत.

परिशिष्ट ३)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे थेरगाव** येथील **स.नं २७/१** मधील **मे. लोटस अर्बन स्पेसेस प्रा. लि. तर्फे संचालक श्री. संतोष विठ्ठलदास कर्नावट** यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील १२ मी. रस्ता रूंदीने व **आ.क्र. ६२७ अ प्राथमिक शाळा** या प्रस्तावाने बाधीत एकुण १७८१.०० चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

**अ) अर्जदार क्र. ३ चे मोजणीचे क्षेत्रासाठी**

पुर्व - स.नं. २८, सि.स.नं. ६२९४ ची मिळकत.

पश्चिम - स.नं. २७, सि.स.नं. ६२६० ची मिळकत.

उत्तर - नाला.

दक्षिण - स.नं. २७, सि.स.नं. ६२६० ची मिळकत.

**ब) अर्जदार क्र. ५ चे मोजणीचे क्षेत्रासाठी**

पुर्व - स.नं. २७, सि.स.नं. ६२६० ची मिळकत.

पश्चिम - नाला.

उत्तर - स.नं. २९, सि.स.नं. ६२५४ ची मिळकत.

दक्षिण - स.नं. २७, सि.स.नं. ६२६० पैकीची मिळकत.

परिशिष्ट ४)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे रावेत येथील स नं ७७/४ पै** मधील श्रीम. स्मिता श्रीपती काटे यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील १८ मी रस्ता या प्रस्तावाने बाधीत होणारे एकुण क्षेत्र १४०.८७ चौ.मी. मधील जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे रावेत येथील स नं ७७/४ पै
१८ मी रस्ता बाधीत क्षेत्राच्या चतु:सिमा : ( एकुण बाधित क्षेत्र १४०.८७ चौ.मी )

उत्तरेस :- स. नं. ७६ ची मिळकत

पुर्वेस :- लागू रस्ता स.नं. ७७ पैकी व स.नं. ९५ ची मिळकत

दक्षिणेस :- स. नं. ७७ पैकीची मिळकत

पश्चिमेस :- लागू रस्ता स. नं. ७७ पैकीची मिळकत

उपसंचालक,
नगररचना व विकास विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे ४११०१८

जाहिरात क्र. १०६०
दिनांक ८/९/१८

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.